0 9 DEC 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मकता निर्माण करा

## प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील : दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन आणि मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी पालकांसह शिक्षकांनी आणि समाजातील सर्व घटकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या हक्कांबद्दल समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्र यांच्यामार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि



उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकल व सामूहिक नृत्याचे सादरीकरण केले. रतन गुरव यांनी भावगीत सादर केले. युवराज मिठारी यांनी सुरेश भट यांची गझल सादर केली. त्यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.

यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. निलोफर मुजावर, सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड, गणपतराव गाताडे मतिमंद विद्यालय कागल, ज्ञानप्रबोधन संचालित अंध विद्यालय कोल्हापूर येथील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षक सहभागी झाले होते.

09 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनसंस्कृती वाढवण्याची आवश्यकता

## कुलसचिव डॉ. शिंदे : वारणानगरमध्ये विभागीय साहित्य संमेलनाची सांगता

■ सकाळ वृत्तसेवा



वारणानगर: महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा वारणानगरच्या वतीने पुरस्कार वितरणप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राजन मुठाणे, प्रमोद कोरे, माधव गुळवणी, शरद महाजन, के. एम. वाले, प्रा. के. जी. जाधव आदी.

वारणानगर, ता. ८ : 'संस्कृती आणि सामाजिक विकास घडवायचा असेल, तर साहित्याशिवाय पर्याय नाही. नवीन आव्हाने पेलण्याची ताकद साहित्यामध्ये आहे. वाचन आणि लेखन संस्कृती वाढली, तरच साहित्य चळवळीला बळ मिळते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

येथे महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा वारणानगरच्या वतीने २९ वे विभागीय साहित्य संमेलन दोन दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात पार पडले. पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा बँकेचे संचालक प्रमोद कोरे होते.

या सोहळ्यात 'तात्यासाहेब कोरे कादंबरी पुरस्कार' गुहागरच्या डॉ. बाळासाहेब लबडे यांच्या 'काळमेकर लाईव्ह' कादंबरीला, 'सावित्रीअक्का कोरे काव्य पुरस्कार' सोलापूरचे शिवाजी शिंदे यांच्या 'अंतस्थ हुंकार'ला, 'विलासराव कोरे संकीर्ण साहित्य पुरस्कार' हलकर्णीचे डॉ. चंद्रकांत पोतदार यांच्या 'परिघाच्या रेषेवर'ला, 'मामासाहेब गुळवणी बाल साहित्य पुरस्कार' पुण्याच्या शिवाजी चाळके यांच्या 'अंगतपंगत'ला तर 'शोभाताई कोरे कथा साहित्य पुरस्कार' सांगलीच्या महादेव माने यांच्या 'वसप'ला दिला.

दरम्यान, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक प्रा. कृष्णात खोत यांची प्रकट मुलाखत साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील, चंद्रकांत निकाडे यांनी घेतली. त्यानंतर बाल साहित्य मेळावा बालसाहित्यिक गोविंद गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यामध्ये साहित्यिक प्रा. टी. आर. गुरव, अशोक पाटील यांच्या उपस्थितीत बालसाहित्यिकांनी कथा सादर केल्या.

यावेळी 'मसाप'चे केंद्रीय निमंत्रक राजन मुठाणे, कार्याध्यक्ष प्रा. के. जी. जाधव, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, कार्यवाह डॉ. श्रीकांत पाटील, माधवराव गुळवणी, शिवाजीराव मोरे, शिवाजी जंगम, के. एम. वाले, शरद महाजन उपस्थित होते. राजेंद्र पाटील, प्रा. पी. बी. बंडगर, नसीम जमादार यांनी सूत्रसंचालन केले.

सहकार्यवाह चंद्रकांत निकाडे यांनी आभार मानले.

### लेखन चळवळीतील युवकांचा सहभाग

'लेखन चळवळीतील युवकांचा सहभाग' परिसंवाद शिवराज विद्यासंकुलचे अध्यक्ष किसनराव कुराडे (गडहिंग्लज) यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. जी. पी. माळी (कोल्हापूर), डॉ. प्रीती शिंदे (वारणा महाविद्यालय), डॉ. सुरज चौगुले (ऐतवडे खुर्द) यांच्या उपस्थितीत झाला. तर कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांच्या अध्यक्षतेखाली अरविंद मानकर (सरवडे), अनिल शिनगारे (कोडोली), संपतराव चव्हाण (बहिरेवाडी), जयवंत आवटे (कुंडल) यांनी कथा सादर केल्या.

0 9 DEC 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आव्हाने पेलण्यासाठी साहित्य चळवळीला बळ द्या

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे : वारणेत २९ व्या विभागीय साहित्य संमेलनाची सांगता

**वारणानगर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्राची संस्कृती आणि सुसंस्कृत समाजाचे स्थान बळकट करून संस्कृती आणि सामाजिक विकास घडवायचा असेल, तर साहित्याशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. नवीन आव्हाने पेलण्याची ताकद साहित्यामध्ये असल्याने वाचन आणि लेखन चळवळीला बळ द्या, असे आवाहनही केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे २९ वे विभागीय साहित्य संमेलनाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा बँकेचे संचालक प्रमोद कोरे होते.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रा. कृष्णात खोत यांची प्रकट मुलाखत साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील, चंद्रकांत निकाडे यांनी घेतली. त्यानंतर बाल साहित्य मेळावा गोविंद गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रा. टी. आर. गुरव, अशोक पाटील यांच्या उपस्थितीत बालसाहित्यिकांनी कथा सादर केल्या.

लेखन चळवळीत युवकांचा सहभाग परिसंवाद शिवराज विद्यासंकुलचे अध्यक्ष किसनराव कुराडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यात डॉ. जी. पी. माळी, डॉ. प्रीती शिंदे, डॉ. सूरज चौगुले सहभागी झाले. कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांच्या अध्यक्षतेखाली अरविंद मानकर (सरवडे), अनिल शिणगारे (कोडोली), संपतराव चव्हाण (बहिरेवाडी), जयवंत आवटे (कुंडल) यांनी कथा सादर केल्या.

यावेळी मसापचे केंद्रीय निमंत्रक राजन मुठाणे, के. एम. वाले, कार्याध्यक्ष ग्रंथमित्र प्रा. के. जी. जाधव, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, कार्यवाह डॉ. श्रीकांत पाटील, माधवराव गुळवणी, शिवाजी जंगम, शरद महाजन उपस्थित होते. राजेंद्र पाटील, प्रा. पी. बी. बंडगर, नसीम जमादार यांनी सूत्रसंचालन केले.

सहकार्यवाह चंद्रकांत निकाडे यांनी आभार मानले. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहातील सर्व संस्थांचे सहकार्य लाभले.

### या पुस्तकांना पुरस्कार...

सायंकाळी पुरस्कार वितरण सोहळा झाला. तात्यासाहेब कोरे कादंबरी पुरस्कार गुहागरचे डॉ. बाळासाहेब लबडे यांच्या काळमेकर लाईव्ह गुहागर कादंबरीला, सावित्री अक्का कोरे काव्य पुरस्कार सोलापूरचे शिवाजी शिंदे यांच्या अंतस्थ हुंकार या पुस्तकाला, विलासराव कोरे संकीर्ण साहित्य पुरस्कार हलकर्णीचे डॉ. चंद्रकांत पोतदार यांच्या परिघाच्या रेषेवर या पुस्तकाला तर मामासाहेब गुळवणी बाल साहित्य पुरस्कार पुण्याचे शिवाजी चाळके यांच्या अंगत पंगत या पुस्तकाला, शोभाताई कोरे कथा साहित्य पुरस्कार सांगलीचे महादेव माने यांच्या वसप या पुस्तकाला प्रदान करण्यात आला.

0 9 DEC 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे : वारणेत विभागीय साहित्य संमेलनाची सांगता

# वाचन, लेखन संस्कृती वाढली तरच साहित्य चळवळीला बळ मिळेल

लोकमत न्यूज नेटवर्क

वारणानगर : नवी आव्हाने पेलण्याची ताकद साहित्यामध्ये असून, वाचन आणि लेखन संस्कृती वाढली तरच साहित्य चळवळीला बळ मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी येथे केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा वारणानगर यांच्या वतीने २१व्या विभागीय साहित्य संमेलनात विविध पुरस्कार वितरण झाले. त्यावेळी डॉ. शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा बँकेचे ज्येष्ठ संचालक प्रमोदराव कोरे होते.



महाराष्ट्र साहित्य परिषद आयोजित साहित्य संमेलनात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. यावेळी राजन मुठाणे, प्रमोद कोरे, माधव गुळवणी, शरद महाजन, के. एम. वाले, ग्रंथमित्र प्रा. के. जी. जाधव, आदी मान्यवर उपस्थित होते.

संमेलनात तात्यासाहेब कोरे कादंबरी पुरस्कार, गुहागरचे डॉ. बाळासाहेब लवडे यांच्या काळमेकर लाइव्ह गुहागर कादंबरीला, सावित्रीआक्का कोरे काव्यपुरस्कार सोलापूरचे शिवाजी शिंदे यांच्या अंतस्थ हुंकार, विलासराव कोरे संकीर्ण साहित्य पुरस्कार हलकर्णीचे डॉ. चंद्रकांत पोतदार यांच्या परिघाच्या रेषेवर, मामासाहेब गुळवणी बालसाहित्य पुरस्कार पुणे येथील शिवाजी चाळके यांच्या अंगत-पंगत, शोभाताई कोरे कथासाहित्य पुरस्कार सांगलीचे महादेव माने यांच्या वसप या साहित्यास प्रदान करण्यात आले.

दुपारच्या सत्रात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक प्रा. कृष्णात खोत यांची प्रकट मुलाखत साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील व चंद्रकांत निकाडे यांनी घेतली. बालसाहित्यिक गोविंद गोडबोले, साहित्यिक प्रा. टी. आर. गुरव, अशोक पाटील यांच्या उपस्थितीत बालसाहित्यिकांनी कथा सादर केल्या. लेखन चळवळीतील युवकांचा सहभाग परिसंवादात शिवराज विद्यासंकुलाचे अध्यक्ष किसनराव कुराडे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. जी. पी. माळी, डॉ. प्रीती शिंदे, डॉ. सूरज चौगुले यांनी विचार मांडले. कथाकथनकार आप्पासाहेब खोत, अरविंद मानकर, अनिल शिणगारे, संपतराव चव्हाण, जयवंत आवटे यांनी कथा सादर केल्या. यावेळी 'म.सा.प'चे केंद्रीय निमंत्रक राजन मुठाणे, कार्याध्यक्ष ग्रंथमित्र प्रा. के. जी. जाधव, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, कार्यवाह डॉ. श्रीकांत पाटील, वारणा दूध संघाचे संचालक माधवराव गुळवणी, शिवाजी मोरे, शिवाजी जंगम, के. एम. वाले, शरद महाजन, आदी उपस्थित होते. राजेंद्र पाटील, प्रा. पी. बी. बंडगर, नसीम जमादार यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. सहकार्यवाह चंद्रकांत निकाडे यांनी आभार मानले.

0 0 DEC 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध स्पर्धांच्या बक्षीस समारंभाने गार्डन क्लबच्या पुष्पप्रदर्शनाची सांगता

## तीन दिवसीय फुलांच्या महोत्सवास नागरिकांचा प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध स्पर्धांच्या बक्षीस समारंभाने गार्डन्स क्लब आणि कोल्हापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ५४व्या पुष्पप्रदर्शनाची रविवारी सांगता झाली. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे होते.

यावेळी अतिरिक्त एसपी, सीआयडी मनीषा दुबुले, गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी, रोटरी क्लब ऑफ गार्गीजच्या अध्यक्ष योगिनी कुलकर्णी, सचिव लक्ष्मी शिरगावकर, मृदा शास्त्रज्ञ डॉ. अरुण मराठे उपस्थित होते. अनिता ढवळे यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली काशीद यांनी परिचय करून दिला. बक्षीस वितरण वाचन संगीता कोकितकर आणि सुनेत्रा ढवळे यांनी केले. सुप्रिया भस्मे यांनी आभार मानले.

पथनाट्य स्पर्धेत चिमुकल्यांनी खणखणीत घोषणा आणि गाणी गात मातीचं महत्त्व पुरेपूर पटवून दिलं. बॉटनिकल फॅशन शोला शहरवासीयांनी विशेषतः तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पाने, फुले, टरफले आदी वापरून केलेल्या पेहरावातून नवदुर्गा आणि स्त्री पुरुष समानतेच्या संकल्पना मुलांनी प्रभावीपणे सादर केल्या. यावेळी नीरज झंवर, जिया झंवर, कर्नल कुल्लोल्ली, डॉ. कुल्लोल्ली, बिना जनवाडकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

चित्रकला स्पर्धेत 'आपली माती आपले भवितव्य' या विषयावर लहान-थोर स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यावेळी हँडीक्राफ्ट सर्व्हिस सेंटरचे वरिष्ठ सहायक संचालक चंद्रशेखर सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी रमेश शाह, सुभाषचंद्र अथणे, अशोक डुणुंग, शशिकांत दोशी उपस्थित होते. 'हसत खेळत पर्यावरण'अंतर्गत भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिलराज जगदाळे यांनी मुलांचे पर्यावरणावर आधारित खेळ घेतले. कोल्हापुरातील चिनार भिंगार्डे यांनी मुलांना कॉयर आर्ट कार्यशाळेत मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात गार्डन्स क्लबच्या विविध स्पर्धेतील निवडक शॉर्ट फिल्मचे स्क्रिनिंग आणि विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

### विविध स्पर्धांचे निकाल

- **पथनाट्य स्पर्धा :** प्रथम-अर्ली ॲक्टर्स ऑफ कोल्हापूर, द्वितीय-ग्रीन सोल्जर्स, तृतीय-सेव्हन्थ डे ॲडवेंटिस्ट हायर सेकंडरी स्कूल, विशेष गौरव-रोटरी कर्णबधिर शिशू विद्यालय.
- **फॅशन शो :** प्रथम-एनआयए ग्लोबल कोल्हापूर, द्वितीय-न्यू कॉलेज ऑफ आर्किटेक्चर.
- **स्पॉट गार्डन :** प्रथम-कला प्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन, द्वितीय-डेक्कन कॉलेज ऑफ इंटिरियर डिझाईन, तृतीय-एनआयएफ ग्लोबल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 DEC 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२४ रविवारी झालेल्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. हजारो विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात गैरप्रकार घडू नयेत म्हणून भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार परीक्षा द्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 DEC 2024
तरुण भारत

# सिद्धेश निंबाळकर यांची धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**कोलोली :** यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,वारणानगर या ठिकाणी संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेजचा



विद्यार्थी सिद्धेश निंबाळकर याने चतुर्थ क्रमांक पटकावला. त्याची भुवनेश्वर (ओडिशा) या ठिकाणी होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी धनुर्विद्या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झाली आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव शिवाजीराव पाटील यांनी दिली. त्याला संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष डॉ. के.एस. चौगुले, डॉ.विजयकुमार पाटील, संचालक प्रा. संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

09 DEC 2024
दैनिक श्री. रणझुंजार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे आवश्यक : कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील



१) जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. महादेव देशमुख आणि शिक्षक. २) जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. मंचावर (डावीकडून) डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. सुहासिनी पाटील आणि डॉ. महादेव देशमुख.

कोल्हापूर : दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन आणि मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी पालकांसह शिक्षकांनी आणि समाजातील सर्व घटकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या हक्कांबद्दल समाजामध्ये जाणीव-जागृती निर्माण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज् आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्र यांच्यामार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आपल्याकडे जे नाही, त्याकडे दुर्लक्ष करून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ध्यास घेतला पाहिजे. जागतिक स्तरावर दिव्यांग असून सुद्धा अलौकिक यश संपादन करणाऱ्या अनेक व्यक्ती आहेत. या आदर्श व्यक्तींचे स्मरण करून आपल्या व्यंगावर मात करून पुढे जाण्यासाठी योग्य ती कार्यप्रणाली निर्माण केली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे या जगामध्ये अशक्य असे काहीही नाही. प्रतिकूल परिस्थितीमध्येही असामान्य कामगिरी करणारे लोक यशाच्या शिखरावर जातात. दिव्यांग शारीरिकदृष्ट्या दुर्बल असले तरी मानसिकदृष्ट्या त्यांनी सुदृढ राहिले पाहिजे. प्रयोगशील उपक्रमांच्या माध्यमातून बौद्धिक उंची वाढविण्यासाठी मार्गदर्शन करणे ही आजची गरज आहे. सामाजिक लाभापासून वंचित न राहता समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

जीवन सुखकर बनविण्यासाठी कोणत्याही कलेची जोपासना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख म्हणाले, देशाच्या प्रगतीमध्ये दिव्यांग व्यक्तींचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. या मुलांमध्ये प्रचंड मोठी चेतना आणि ऊर्जा आहे. कौशल्यपूर्वकपणे आत्मसात केलेल्या शिक्षणामुळे त्यांच्या कलेला सर्वत्र उत्तम प्रतिसाद प्राप्त होत आहे. सर्व प्रकारच्या आव्हानांवर मात करून हे विद्यार्थी मार्गक्रमण करताना पाहून खूप कौतुक वाटते.

या कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकल व सामूहिक नृत्याचे सादरीकरण केले. श्रीमती रतन गुरव यांनी भावगीत सादर केले. युवराज मिठारी यांनी सुरेश भट यांची गझल सादर केली. या कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

युजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज् आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. निलोफर मुजावर आणि सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड, कोल्हापूर, श्री गणपतराव माळाई मतिमंद विद्यालय, कागल, ज्ञानप्रबोधन संचलित अंध विद्यालय, कोल्हापूर येथील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षक सहभागी झाले. विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

09 DEC 2024
दैनिक श्री रणझुंजार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात स्तनाच्या कर्करोगावर उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती

## डॉ. गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांच्या संशोधनाला भारतीय आणि युके पेटंट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हाइपरथर्मिया (Hyperthermia) या महत्त्वाच्या उपचारांसाठी आवश्यक असणाऱ्या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय युके पेटंटही प्राप्त झाले आहे.



डॉ. गजानन राशीनकर



डॉ. प्रज्ञा पाटील



डॉ. राशीनकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅनो-मॅग्नेटाइटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बिनचे (एन.एच.सी.) आवरण चढविण्यात येते आणि त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया या उपचार पद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाऊ शकतात. चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते, तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटीग्रेड इतके तापमान निर्माण होते. यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. विशेष बाब म्हणजे हे नॅनोकण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतात.

या प्रक्रियेदरम्यान सर्वसाधारण पेशींना फार मोठ्या प्रमाणावर अपाय न करता केवळ स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता या नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो.

हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन आणि मूलभूत धातूपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक स्वरूपाचे ठरणार आहे, असेही डॉ. राशीनकर यांनी सांगितले.

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. पद्मा दांडगे, डी.वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. विश्वजीत खोत आणि डॉ. अर्पिता तिवारी यांनीही मोलाचे योगदान दिले.

सदर संशोधनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

### 'समाजोपयोगी संशोधनाचा वसा'

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी अलीकडील काळात केलेले संशोधन आणि त्यांना प्राप्त झालेले पेटंट यांची क्षेत्रे पाहता ती विद्यापीठाचा समाजोपयोगी संशोधनाचा वसा आणि वारसा सिद्ध करणारी आहेत. डॉ. राशीनकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे संशोधनही याच स्वरूपाचे आहे.

कर्करोगावरील संशोधनाच्या क्षेत्रामधील मूलभूत संशोधनाला तसेच भावी संशोधनालाही त्यातून चालना मिळेल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.